# महिला उद्योजकतेतून महिला सक्षमीकरण

**डॉ. सुषमा वा. बोंडे**
हुतात्मा राष्ट्रीय कला व विज्ञान महाविद्यालय,
आष्टी, जि. वर्धा.
sushamakharabe@gmail.com

---

***गोषवारा :***

*या संशोधनात शहरी व ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणाचा विचार केला असता शहरी भागात गृहउद्योगाचे किंवा व्यवसायाचे प्रमाण अधिक आढळून आले. तर त्या तुलनेत ग्रामीण भागात गृहउद्योगाचे / व्यवसायाचे प्रमाण कमी आहे. शहरी विभागात ग्राहक वर्ग अधिक आहे तर आर्थिकदृष्ट्या गरीब असल्यामुळे ग्रामीण भागात ग्राहकवर्ग कमी आहे. गृहउद्योगावर शिक्षणाचाही परिणाम होतो. शिक्षित महिलांमध्ये गृहउद्योगाचे प्रमाण अधिक आहे. अर्थार्जनामुळे स्त्रियांमधील आत्मविश्वास वाढतो व निर्णय क्षमता देखील वाढते असे निरीक्षणावरुन आढळून आले.*

*महिला कौटुंबिक जबाबदारी यशस्वीपणे पार पाडू शकतात. गृहउद्योगासाठी भांडवल उभे करणे ग्रामीण शहरी भागातील आर्थिकदृष्टया कमकुवत महिलांना कठीण जाते. याशिवाय शासनाच्या अर्थसहाय्याच्या विविध योजनांची माहिती ही ग्रामीण महिलांमध्ये विशेष आढळून येत नाही. अर्थसहाय्य करणाऱ्या संस्था, बँक, कार्यालय ही शहरात असल्यामुळे ग्रामीण महिलांना प्रत्येक कामासाठी शहरात यावे लागते. त्यामुळे वेळ, श्रम व पैसा व व्यय अधिक खर्च होतो. शिक्षणाचे प्रमाण ही शहरी महिलांच्या तुलनेने ग्रामीण महिलांमध्ये कमी दिसून येते. त्यामुळे बऱ्याचदा तांत्रिक अडचणी निर्माण होतात. तरीही उद्योजक महिलांमध्ये सक्षमीकरणाचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास येते.*

---

**बीजशब्द** :– महिला, उद्योजकता, सक्षमीकरण, उदयोग, आत्मविश्वास.

**प्रस्तावना**

'महिला सक्षमीकरण' हा आजच्या काळात अतिशय प्रचलित शब्द आहे. परंतु तरीही तितकाच दुर्लक्षित आहे. मा. राजीव गांधी पंतप्रधान असतांना महिलांच्या आर्थिक उत्पन्नासाठी बचत गटाची निर्मिती केली व या बचत गटामार्फत अनेक महिला या छोटे छोटे गृहउद्योग चालवितात व कुटुंबाला आर्थिक सहकार्य करतात.

राज्याच्या आर्थिक विकासात महिला उद्योजगता महत्वाचा स्त्रोत मानला गेला आहे. महिला उद्योजक समाजामध्ये व्यवस्थापन, संघटन व व्यवसायाशी संबंधित बाबींमध्ये निरनिराळे आयाम प्रस्तुत करीत आहेत. आजच्या आधुनिक गतिमान युगात शाश्वत आर्थिक व सामाजिक विकासाच्या जागतिक वाटचालीमध्ये महिला उद्योजकांची महत्त्वाची भूमिका आहे. महाराष्ट्र राज्यात महिलांनी समाजामध्ये जरी मोलाची भूमिका निभावली असली तरीही अनेक कारणामुळे त्यांच्यातील उद्योजकीय कार्यक्षमतेला पुरेसा वाव मिळालेला नाही. सद्य:स्थितीत महिला उद्योजकापुढे लिंगभेद व समाजातील स्थान, व्यवसाय सुरु करण्यासाठी अपुरे स्त्रोत, तांत्रिक व व्यवस्थापकीय ज्ञानाचा अभाव, मर्यादित आर्थिक स्त्रोत व गुंतवणूक सहाय्य, परवडण्याजोग्या व सुरक्षित व्यावसायिक जागांचा अभाव इत्यादी अनेक आव्हाने आहेत.

मानवसमुहात स्त्री जातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. मानवी हक्काविषयी अनेक आंतरराष्ट्रीय करारात मान्यता मिळूनही, स्त्रिया निर्धन आणि निरक्षर राहण्याचे प्रमाण मोठे आहे. वैद्यकीय सुविधा, मालमत्तेची मालकी, पतपुरवठा, प्रशिक्षण आणि रोजगारात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना कमी संधी मिळते. पुरुषांच्या तुलनेत राजकीयदृष्ट्या सक्रिय असण्याची शक्यता फारच कमी आहे आणि घरगुती हिंसाचारात बळी होण्याची शक्यता खूपच मोठी आहे. स्त्रियांची मानसिकता बदलणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागात स्त्रिया अजूनही स्वत: निर्णय घेऊ शकत नाही. त्या पुरुषांच्या निर्णयावर अवलंबून असतात. त्यांची निर्णयक्षमता वाढविणे गरजेचे आहे. घटनेने अनेक अधिकार दिलेले आहेत. याची माहिती त्यांच्यापर्यंत पोहाचली पाहिजे, त्यांचे प्रबोधन झाले पाहिजे. १००% ती सक्षम आहे असे आपण म्हणू शकत नाही. नवऱ्याचे अस्तित्व आणि प्रतिष्ठा यावर स्त्रीची किंमत होते. नवऱ्याच्या अस्तित्वावर तिचे रुपही बदलतात. नवरा असल्यास सौभाग्यवती, नवरा गेला की ती विधवा, नवऱ्याने सोडलेली ती परितक्ती अशा बिरुदावल्या स्त्रियांना लावल्या जातात.

भारतात बहुसंख्य स्त्रिया या घरकामात गुंतलेल्या असतात. कमी उत्पादकतेची व कमी कौशल्याची कामे स्त्रियांकडे दिली जातात. म्हणून स्त्रियांना आर्थिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जाते. महिलांचे आर्थिकदृ ष्ट्या सबलीकरण होण्याचे प्रमाण व वेग कमी आहे. महिला या उपजीविकेसाठी शेती, मजुरी, उद्योग, दुग्ध व्यवसाय इत्यादी क्षेत्रात काम करत असतात परंतु त्या कामाचे कधीच मोजमाप केले जात नाही. त्यामुळे आर्थिक सबलिकरणाला चालना मिळत नाही.

बचतगटातील महिलांच्या उत्पन्न वाढीसाठी सुक्ष्म उपजीविका आराखडा तयार करण्यात आला आहे. बचतगटाच्या माध्यमातून शेळीपालन प्रकल्प, दुग्धव्यवसाय, सामुहिक शेती, लाख उत्पादन, स्वस्त धान्य दुकान चालविणे, अंगणवाडयांना आहार पुरवठा करणे, लाकडी नक्षीदार वस्तु तयार करणे, कुक्कुटपालन यासह अन्य उद्योग व्यवसाय बचतगटातील महिला करीत आहेत.

बचतगटामुळे ग्रामीण भागातील महिलांच्या नेतृत्व विकासाला चालना मिळाली आहे. बचतगटातून अनेक महिला आज जिल्हा परिषद पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीच्या पदाधिकारी आहेत. मविमच्या माध्यमातून आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमातून व स्पर्धेतून त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळत आहे.

२४ फेब्रुवारी १९७५ मध्ये आपल्या देशात महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. या महामंडळाच्या माध्यमातून महिलांच्या सुप्त उद्योजकीय जाणीव विकसित करणे, रोजगार संधी व बाजारपेठ यांची सांकड घालणे आणि महिलांना आत्मनिर्भरतेच्या दिशेने वाटचाल करण्यास प्रवृत्त करणे इत्यादी प्रयत्न प्रस्तुत महामंडळाच्या माध्यमातून होतांना दिसून येतात. अशाच प्रकारचे महिलाविषयक धोरण राबविणारे महाराष्ट्र हे १९९४ मध्ये भारतातील पहीले राज्य ठरले.

अनेक व्यवसाय असे आहेत जे कोणतीही महिला तिच्या घरातून करु शकते आणि तिच्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावू शकते. दररोजच्या कामामधून अगदी थोडा वेळ काढून आणि थोडे प्रयत्न केल्यास कोणतीही महिला अगदी सहजतेने हे व्यवसाय करु शकते.

- इंटरनेटशी संबंधित घरगुती व्यवसाय कल्पना
- ऑनलाईन बुकींगचा व्यवसाय
- वेबडिझायनिंग
- वेबसाईट

- शिक्षण क्षेत्राशी निगडीत– शिकवणी, कोचिंग क्लासेस, संगीत शिकवणी.
- महिलांसाठी सेवा क्षेत्रातील घरगुती व्यवसाय :– अकांऊट किपींग, विवाह जमवणारे कार्यालय, इव्हेंट प्लॅनींग, ब्लॉग लिहीणे, लहान मुल सांभाळण्याचा व्यवसाय, ब्युटी पार्लरचा व्यवसाय, घरातून विविध वस्तुंची विक्री.
- स्त्रियांसाठी खाद्य पदार्थ आधारित घरगुती व्यवसाय :– मिठाई व्यवसाय, घरगुती खानावळ, स्वयंपाकाची शिकवणी, घरगुती लोणचे, पापड, शेवळया आणि तुप उत्पादन व्यवसाय, घरगुती केक बनविणे इत्यादी.
- सर्जनशीलतेवर आधारित व्यवसाय – मेंहदी, दागिन्यांचा व्यवसाय, शिवणकाम व्यवसाय, मेणबत्ती बनविण्याचा व्यवसाय, रुखवंत तयार करुन देणे इत्यादी.

काही व्यवसाय हे शहरी / नागरी भागातच यशस्वी ठरतात तर काही व्यवसाय हे ग्रामीण भागात यशस्वी ठरतात.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. महिलांमधील व्यवसायाचे प्रमाण निश्चित करणे.
२. महिलांच्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीबद्दल जाणून घेणे.
३. नागरी व ग्रामीण भागातील व्यवसायातील बदल लक्षात घेणे.
४. महिलांमधील कला कौशल्याची आवड जाणून घेणे.

**गृहीतकृत्ये :**

१. दिवसेंदिवस महिलांचा व्यवसायाकडे कल वाढत आहे.
२. ग्रामीण भागातील महिलांमध्ये गृहउद्योगाचे प्रमाण कमी आहे.
३. व्यवसायामुळे कुटुंबाचा जीवनस्तर उंचावत आहे.
४. व्यवसायामुळे गृहीणीचा घराच्या जबाबदाऱ्यावर कोणताही परिणाम होत नाही.

**संशोधन क्षेत्राची निवड :**

या संशोधनाकरिता आष्टी गावाच्या क्षेत्राची निवड करण्यात आली.

**अध्ययन पद्धती :**


व्यवसायातून / गृहउद्योगातून महिलांचे सक्षमीकरण जाणून घेण्यासाठी नमूना म्हणून आष्टीतील शहरी व ग्रामीण भागातील महिलांची एकक म्हणून निवड करण्यात आली. एकूण १०० एकक नमुना म्हणून घेण्यात आले. हे अध्ययन संशोधनात्मक व निरिक्षणात्मक असून माहीती संकलनासाठी प्रश्नावली पद्धतीचा उपयोग करण्यात आला.

**सारणी**


व्यवसाय करणाऱ्या व व्यवसाय न करणाऱ्या महिलांच्या प्रमाणाबाबत (शहरी / ग्रामीण)

| रहिवासी | व्यवसाय करणाऱ्या | टक्केवारी | व्यवसाय न करणाऱ्या | टक्केवारी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| नागरी / शहरी | १८ | ६० | १२ | ४० | ३० |
| ग्रामीण | १० | ३३.३३ | २० | ६६.६७ | ३० |

नागरी / शहरी




**ग्रामीण**




नागरी व ग्रामीण एकूण ३०—३० महिलांची निवड नमूना एकक म्हणून करण्यात आली. नागरी ३० महिलांपैकी एकूण १८ महिला गृहउद्योग करणाऱ्या आहेत तर १२ महिला या कोणत्याही गृहउद्योग न करणाऱ्या आहेत. ग्रामीण ३० महिलांपैकी केवळ १० महिला गृहउद्योग करतात तर २० महिला या गृहउद्योग न करणाऱ्या आहेत.

शहरी / नागरी विभागातील महिलांमध्ये गृहउद्योग करण्याचे प्रमाण अधिक आहे. त्या तुलनेत ग्रामीण गृहउद्योगाला प्रतिसाद कमी मिळतो. बचतगटामार्फत जे काही गृहउद्योग चालविले जातात. तेवढेच साधारणपणे आढळून येतात. स्त्री आर्थिक दृष्टया सक्षम असली की तीचा आत्मविश्वास वाढतो त्याचबरोबर समाजात आत्मसन्मान मिळते. कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पेलण्याची क्षमता गृहउद्योगामुळे मिळते. त्याच बरोबर स्त्रियांमधील निर्णय क्षमतेचा विकास होतो. आर्थिकदृष्टया सक्षम असल्यामुळे कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमाणही कमी झाल्याचे दिसून येते. कुटुंबाच्या अधिकाअधिक गरजा पूर्ण केल्या जातात. मुलांना शिक्षणाच्या सोई उपलब्ध करुन देवू शकते. गृहउद्योग करणाऱ्या महिलेकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन सकारात्मक बनतो. आत्मसन्मानाचे जीवन ती स्त्री जगू शकते. कुटुंबावर कोणतेही आर्थिक संकट आल्यास कुटुंबाला ती आधार देवू शकते म्हणून महिलांच्या सक्षमीकरणात तिच्या अर्थार्जनासाठी केलेल्या गृहउद्योगाचा वाटा अधिक आहे.

**निष्कर्ष :—**

१. शहरी भागातील महिलांमध्ये उद्योजकतेचे प्रमाण अधिक दिसून येते.
२. ग्रामीण भाग ग्राहक वर्ग तितकासा आर्थिकदृष्टया सक्षम नसल्यामुळे महिला उद्योजकांना प्रतिसाद कमी प्रमाणात मिळतो.
३. गृहउद्योगामुळे स्त्रीया आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण झाल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढलेला दिसून येते.
४. महिला उद्योजकांमध्ये निर्णय क्षमता अधिक दिसून येते.

**शिफारसी :—**

१. सरकारच्या आर्थिक योजना ग्रामीण भागापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.
२. बचतगटामार्फत किंवा स्वतंत्र गृहउद्योग करणाऱ्या महिलांच्या मालाला प्रदर्शन किंवा बाजारपेठ स्थान मिळणे आवश्यक आहे.
३. पुरुषांची मानसिकता बदलून गृहउद्योग करणाऱ्या महिलांकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक असावा.
४. मोठया उद्योगांनी गृहोद्योगाला सहकार्य करावे.

**संदर्भ सूची :**

१. शिक्षण संक्रमण — मार्च २००२
२. गृहशोभिका — मे २०११
३. महिला कल्याण और विकास — प्रा. सौ. माधवी कवी
४. महात्मा फुले गौरव ग्रंथ — धनंजय किर, संपादक मंडळ अध्यक्ष — साळुंखे
५. डतण्अपोंचमकपंण्पदध्वेबपंस्‌.मस
६. दैनिक सकाळ — २६/१/२०१० संपादकीय लेख (पान क्र. ४)
७. गृहशोभिका जून २००५ करिअर विशेषांक — संपादक व प्रकाशन — पारेश बाग (पृष्ठ क्र. २०—२१)
८. भारतातील महिला विकासाची वाटचाल — आपटे, रोडे